आपलं महानगर
www.mymahanagar.com

# ‘प्रजा’चे प्रगती पुस्तक : पहिले अमिन पटेल, सुनील प्रभू दुसरे तर तिसऱ्या मनिषा चौधरी

Written By **My Mahanagar Team** July 11, 2023 8:25 PM Mumbai



*संग्रहित छायाचित्र*

मुंबई: राज्याच्या हिवाळी अधिवेशन २०२१ ते हिवाळी अधिवेशन २०२२ या कालावधीत मुंबईतील विविध राजकीय पक्षांच्या आमदारांच्या कामगिरीबाबत ‘ प्रजा फाऊंडेशन’ तर्फे प्रगती पुस्तक प्रकाशित केले आहे. त्यानुसार, सध्या सत्तेत नसलेल्या काँग्रेस पक्षाचे आमदार अमीन पटेल यांनी पहिल्या तीनमध्ये, प्रथम क्रमांक (८२.८० टक्के) पटकावला आहे. तर शिवसेनेचे ( उबाठा) आमदार, प्रतोद सुनील प्रभू यांनी दुसरा क्रमांक (८१.३०) मिळवला आहे. सत्ताधारी भाजपच्या आमदार मनीषा चौधरी यांनी तिसरा क्रमांक (७५.०५ टक्के) मिळवून भाजपचे नाक कसे तरी राखण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.पहिल्या तीन क्रमांकात राष्ट्रवादी काँग्रेस, समाजवादी पक्ष यांचे कुठेच नाव दिसत नाही.

## विधी मंडळ अधिवेशनाचा कालावधीत ३४ टक्केने घट

‘प्रजा फाऊंडेशन’ने मुंबईतील ३१ आमदारांचे प्रगती पुस्तक तयार केले आहे.सन २०११ ते २०२२ या विधीमंडळ अधिवेशनाच्या कालावधीत ३४ टक्केने घट झाली आहे. यात १२ व्या विधीमंडळात २०११ ते २०१२ या काळात अधिवेशनाचे दिवस ५८ होते. ते १४ व्या विधीमंडळात २०२१ ते २०२२ या हिवाळी अधिवेशनात ३८ दिवस झाले. याच

कालावधीमध्ये विचारलेल्या प्रश्नांची संख्या ६७ टक्केने कमी झाली. १२ व्या विधीमंडळात विचारलेले प्रश्न ११,२१४ होते तर १४ व्या विधीमंडळात ३,७४९ इतके प्रश्न विचारण्यात आले होते. मुंबईसाऱख्या शहरांमध्ये आणि राज्य विधीमंडळाचे कामकाजही पुरेसे दिवस चालत नसेल तिथे नागरिकांच्या समस्या आणि जनहिताचे प्रश्न मागेच पडणार हे त्यांच्या घटलेल्या संख्येवरून समोर आले आहे. कामकाजाचे दिवस कमी म्हणजे जनहिताच्या मुद्द्यांवर चर्चेची संधी कमी असेच दिसते. त्यामुळे अधिवेशनाचा कालावधी वाढवण्याची आणि पुरेसे दिवस अधिवेशन चालण्याची किती गरज आहे हे यावरून स्पष्ट झाले असल्याचे प्रजा फाऊंडेशनचे विश्लेषण विभागाचे प्रमुख योगेश मिश्रा यांनी म्हटले आहे.

## भाजपच्या काही आमदारांची कामगिरी घसरली

भाजपची आघाडीची तोफ असलेले मुंबई अध्यक्ष आशिष शेलार हे गतवर्षी ७ व्या क्रमांकावर होते. मात्र यंदा ते ९ व्या क्रमांकावर घसरले आहेत. भाजपचे अतुल भातखळकर हे गतवर्षी ५ व्या क्रमांकावर होते ते थेट १७ व्या क्रमांकावर फेकले गेले आहेत. भाजपचे आमदार तमिळ सेलवन हे गतवर्षी ११ व्या क्रमांकावर होते ते एकने घसरून १२ क्रमांकावर घसरले आहेत. तसेच, आमदार कालिदास कोळंबकर हे १२ व्या क्रमांकावरून २० व्या क्रमांकावर घसरले आहेत. आ. पराग आळवणी हे २ ऱ्या क्रमांकावरून ७ व्या क्रमांकावर गेले आहेत. आ. योगेश सागर हे १० व्या क्रमांकावरून १४ व्या क्रमांकावर घसरले आहेत. मात्र भाजपचे आमदार अमित साटम यांनी आपला ४ था क्रमांक अबाधित ठेवला आहे. तसेच, आमदार भारती लव्हेकर यांनी काहिशी चांगली कामगिरी करीत १३ व्या क्रमांकावरून ६ व्या क्रमांकावर उडी घेतली आहे. तसेच, आमदार पराग शाह यांनीही काहीशी चांगली कामगिरी करीत १४ व्या क्रमांकावरून थेट ५ व्या क्रमांकावर झेप घेतली आहे. आमदार मिहीर कोटेचा यांनीही १५ व्या क्रमांकावरून थेट ११ व्या क्रमांकावर उडी घेतली आहे.

## शिंदे गटही पिछाडीवर

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना गटाचे काही आमदार काहीशा पिछाडीवर पडले आहेत. आमदार सदा सरवणकर हे २१ व्या क्रमांकावरून २८ व्या क्रमांकावर घसरले आहेत.आमदार मंगेश कुडाळकर ९ व्या क्रमांकावरून १३ व्या क्रमांकावर घसरले आहेत. तर दिलीप लांडे यांची कामगिरी २३ व्या क्रमांकावरून २७ व्या क्रमांकवर घसरली आहे.

तर, आमदार प्रकाश सुर्वे यांनी काहीशी चांगली कामगिरी करीत ३० व्या क्रमांकावरून थेट २५ व्या क्रमांकावर झेप घेतली आहे.

## ठाकरे गटाची कामगिरी

माजी मुख्यमंत्री, विद्यमान आमदार व शिवसेना पक्षाचे( उबाठा.) नेते उद्धव ठाकरे गटाचे आमदार सुनील प्रभू यांनी चांगली कामगिरी करीत ३ ऱ्या क्रमांकावरून दुसऱ्या क्रमांकावर भरारी घेतली आहे. तसेच, आमदार रवींद्र वायकर यांनी, ३१ व्या क्रमांकावरून थेट २२ व्या क्रमांकावर तर आमदार रमेश कोरगावकर यांनी २६ व्या क्रमांकावरून २४ व्या क्रमांकावर भरारी घेतली आहे. तर आमदार संजय पोतनीस यांनी थोडीशी प्रगती करीत २२ व्या क्रमांकावरून २१ क्रमांकावर झेप घेतली आहे. आमदार अजय चौधरी यांनी, २४ व्या क्रमांकावरून थेट १९ व्या क्रमांकावर झेप घेत आपली कामगिरी उंचावण्याचा प्रयत्न केला आहे. आमदार सुनील राऊत यांची २० व्या क्रमांकावरून २९ व्या क्रमांकावर घसरण झाली आहे.

Link: Praja foundation report of mla working condition-am (mymahanagar.com)